# ग्रामपंचायत निमोणे

# ता. शिरूर जि. पुणे.

**ई-टेंडर नोटिस क्र.०१ सूचना क्र.१ (२०१९-२०)**

मौजे निमोणे येथे ई-निविदा अंतर्गत सोलर पॉवर पॅक बसविणे साठी दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फी | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे निमोणे येथे अंगणवाडी सोलर पॉवर पॅक बसविणे, ता.शिरूर | २,०००/- | २००/- | पुरवठा आदेशाच्या दिनांक पासून ६० दिवस |
| २ | मौजे निमोणे येथे जि.प शाळेसाठी सोलर पॉवर पॅक बसविणे, ता.शिरूर | २,०००/- | २००/- | पुरवठा आदेशाच्या दिनांक पासून ६० दिवस |

***अटी व शर्ती***

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल सदर निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी, सूचना,शुद्धीपत्रके इत्यादींची माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२) वरील कामांचे निविदा प्रपत्रे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, शर्ती, अटी इ. सदर संकेत स्थळावरून दिनांक २९/०५/२०२० रोजी सकाळी १०:०० ते दिनांक ०३/०५/२० रोजी सायं. ०४.०० वाजेपर्यंत अधिग्रहित(Download) व ऑनलाईन पद्धतीने सादर करता येईल.

३) शासनमान्य अधिकृत उत्पादक/ अधिकृत पुरवठादार यांनी साहित्य पुरवठा स्पेसिफिकेशणप्रमाणे व मंजूर होणारे दराप्रमाणे पुरवणे बंधनकारक राहील.

४) ३ वर्ष देखभाल दुरुस्तीसाठी ५०० रु. स्टॅप पेपरवर करून द्यावा लागेल

५) ग्रामपंचायतीचे मागणीनुसार आवश्यक ते साहित्य पुरवावे लागेल.

६) ई-निविदेतील **अटी-शर्ती** बाबत कसल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

सौ वेळी वालिका भालेकर

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत निमोणे

Scanned with CamScanner

**निविदा भरण्याची कार्यपद्धती:-**

**१) तांत्रिक लिफापा**

A. निविदा प्रपत्र डाउनलोड(Download) केल्याची फी व सुरक्षा अनामत रक्कम ऑनलाईन ई-पेमेंट पद्धतीने जमा करणे बंधनकारक आहे, तसेच निविदा फी बयाना रक्कम ऑनलाइन भरल्याची प्रत स्कन करून उपलोड करणे बंधनकारक आहे.

B. शासनमान्य उत्पादक / अधिकृत पुरवठादार नोंदणी प्रमाणपत्र.

C. **जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र किंवा जीएसटी नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले बाबतची पोहोच स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक राहील**

D. मुंबई दुकान व संस्था अधिनियम १९४८ अन्वये दुकान नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

E. प्राप्तिकर पॅनकार्ड

F. यापूर्वी पूर्ण करण्यात आलेल्या या समकामांचे कामांचे दाखले ( Work Done Certificate) जोडणे आवश्यक आहे.

G. विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडावे.

H. पुरवठा करण्यात येणारे साहित्य ISO प्रमाणित असावेत, त्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे

I. पुरवठादाराने स्पेसिफिकेशनमध्ये नमूद केलेल्या साहित्याचा नमुना (प्रत्येकी १ नग) ग्रामपंचायत निमोणे यांचे कार्यालयात साहित्य निरीक्षणासाठी जमा करून त्याची पोहोच घेऊन सदर पोहोच निविदा सादर करतेवेळी अपलोड करणे आवश्यक राहील.

उपरोक्त पैकी आवश्यक कागदपत्रे अपलोड केलेले नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही, व त्याचा व्यापारी लिफापा उघडला जाणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्रे अपलोड करणेस वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

लिफाफा क्र १ मधे ग्राह्य ठरलेल्या निविदाधारकाचे नमुना साहित्याची तांत्रिक तपासणी औ.प्र.केंद्रा मार्फत करून त्यात ग्राह्य ठरलेल्या निविदाधारकाचेच दरपत्रक उघडून त्यात लघुत्तम येणाऱ्या निविदाधारकाची निविदा मंजूर करणेत येईल.

**२) व्यापारी लिफापा:-**

A. ई-निविदेसोबत जोडलेल्या BOQ File मध्ये निविदा धारकाने फक्त नाव व दर (सर्व करा सहित) नमूद करणे बंधनकारक राहील.

सौ बेबी [illegible]

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत निमोणे
ता.शिरूर जि.पुणे.

Scanned with CamScanner

B. महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्र दि. १९/०८/२०१७ अन्वये निविदाधारकांनी निविदा देकार करतांना दि. ०१/०७/२०१७ ला लागू झालेला वस्तू व सेवा कर कायदा (जिएसटी) व इतर प्रचलित सर्व करांचा विचार करून निविदा देकार सादर करावयाचे आहेत.

**इतर सूचना व माहिती**

१) अग्राह्य निविदाधारकाचे दरपत्र उघडणेत येणार नाही व त्याचा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

२) पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिल्यानंतर ६० दिवस या कालावधीनंतर पुरवठा केल्यास विलंबाने पुरवठा झाल्याचे सिद्ध झाल्यास शासकीय नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करणेत येईल.तसेच निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा निविदा मंजुरीनंतर कामाचे कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्रांच्या विधीगृह्यतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर/फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

३) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफापा क्र.१ शक्यतो दिनांक ०४/०५/२०२०रोजी दुपारी १:०० वाजता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून सरपंच ग्रामपंचायत निमोणे यांचे कार्यालयात उघडनेत येईल.

४) सदर कामासाठी आवश्यक असणारा लेबर पुरवठा हा संबंधीत पुरवठादाराने करावा.

५) पात्र निविदा धारकांकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम हि करारनामा करतेवेळी ग्रामपंचायत निमोणे यांचे नावे ठेव पावती स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत रक्कम देयकातून कपात केली जाईल.

६) निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना, शुद्धिपत्रक अथवा इतर माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

७) निविदा प्रपत्रातील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहील, तसेच प्राप्त निविदापैकी कोणत्याही निविदा अथवा सर्व निविदा नाकारण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायत निमोणे ला राखून ठेवण्यात आले आहेत. निविदाधारकास या बाबतचा खुलासा देता येणार नाही

८) ग्रामपंचायत उपलब्ध निधीनुसार कामाचे देयक अदा केले जाईल.

९) ग्रामपंचायत प्राधान्यक्रमानुसार कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

१०) सदर निविदे प्रक्रिया मध्ये कायदेशीर वाद विवाद उपस्थित झाल्यास त्याबाबतचे कार्यक्षेत्र हे शिरूर न्यायालय राहील.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत निमोणे
ता.शिरूर जि.पुणे.

Scanned with CamScanner

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्यपूर्वक नमूद करतो कि, मी /ग्रामपंचायत निमोणे यांनी मागणी केलेल्या ई निविदेतील अटी, शर्ती व सूचना आम्ही गांभीर्य पूर्वक वाचल्या असून आमचे दर ई-निविदेमध्ये सादर केलेले आहेत. आमची निविदा मंजूर झालेस वरील अटी व शर्तीचे पालन करून प्रपत्र (BOQ File) मधील साहित्य विहित वेळेत पुरवठा करून वरील वर्णनाप्रमाणे साहित्याचा पुरवठा विहित वेळेत करू.

वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास मी / आम्ही दंडनीय कारवाईस पात्र राहू.

**दिनांक:** **पुरवठादार स्वाक्षरी**

नाव. :-

पत्ता. :-

Signature Not Verified

Digitally signed by Bebi Kanifnath Bhalekar
Date: 2020.05.28 23:12:53 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with CamScanner